भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम, १९८४

(१९८४ चा अधिनियम क्रमांक ३)

[१५ जून, १९९६ रोजी यथाविद्यमान ]

# THE PREVENTION OF DAMAGES OF PUBLIC PROPERTY ACT, 1984

**(Act No. 3 of 1984)**

**[ As in force on the 15th June 1996 ]**

*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२००४

[ किंमत : रुपये ४.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १५ जून १९९६ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रिव्हेन्शन ऑफ डॅमेजीस ऑफ पब्लिक प्रॉपर्टी ॲक्ट, १९८४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक २, दिनांक २२ डिसेंबर १९९७ यात पृष्ठ ११५ ते ११६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रितीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली.
दिनांक २२ डिसेंबर १९९७.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Prevention of Damages of Public Property Act, 1984 as on the 15th June 1996 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 8, dated 22nd December 1997 on pages 115 to 116.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi.
Date : 22nd December 1997.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम, १९८४

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त बाब, विस्तार व प्रारंभ

२. व्याख्या

३. सार्वजनिक संपत्तीच्या हानीस कारणीभूत ठरणारी आगळीक

४. सार्वजनिक संपत्तीस आग किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे हानी पोहोचवणारी आगळीक

५. जामिनासंबंधी विशेष उपबंध

६. व्यावृत्ती

७. निरसन व व्यावृत्ती

(शा.म.मु.) एच ४३८६–२ (१,०४०–५-२००४)

# सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम, १९८४

## (१९८४ चा अधिनियम क्रमांक ३)

(१५ जून. १९९६ रोजी यथाविद्यमान)

[१६ मार्च १९९४]

**सार्वजनिक संपत्तीस हानी पोहचण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्याच्याशी निगडित बाबींसाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**१.** (१) या अधिनियमास, '' सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अधिनियम, १९९४, '' असे म्हणावे. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मिर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो दिनांक २८ जानेवारी १९८४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**२.** या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) '' आगळीक '' या शब्दास, भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम ४२५ मध्ये नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणे अर्थ असेल ;

(ख) '' सार्वजनिक संपत्ती '' याचा अर्थ, पुढीलपैकी कोणाच्याही मालकीची असेल किंवा ताब्यात असेल किंवा नियंत्रणाखाली असेल अशी कोणतीही सार्वजनिक, – मग ती स्थावर किंवा जंगम असो – (कोणत्याही यंत्रसामग्रीसह) संपत्ती, असा आहे :—

(एक) केंद्र शासन ; किंवा

(दोन) कोणतेही राज्य शासन ;

(तीन) कोणतेही स्थानिक प्राधिकरण ; किंवा

(चार) केंद्रीय, प्रांतीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये स्थापित झालेला कोणताही निगम ;

(पाच) कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असणारी कोणतीही कंपनी ; किंवा

(सहा) केंद्र शासनाला याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येईल अशी कोणतीही संस्था, परिसंस्था किंवा कोणताही उपक्रम :

परंतु, असा संस्थांना, परिसंस्थाना किंवा उपक्रमांना, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे केंद्र शासनाकडून किंवा एका किंवा अधिक राज्य शासनांकडून पूर्णपणे किंवा भरीवपणे किंवा केंद्र शासनाकडून अंशतः व एका किंवा अधिक राज्य शासनांकडून अंशतः निधीद्वारे भांडवल पुरवण्यात येत असल्याशिवाय केंद्र शासनास या उपखंडान्वये कोणतीही संस्था, परिसंस्था, किंवा उपक्रम विनिर्दिष्ट करता येणार नाही.

**३.** (१) जो कोणी, पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या सार्वजनिक संपत्तीव्यतिरिक्त, इतर कोणत्याही सार्वजनिक संपत्तीच्या बाबतीत, कोणतीही कृती करून आगळीक करील, त्यास पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा होईल. सार्वजनिक संपत्तीच्या हानीस कारणीभूत ठरणारी आगळीक.

(२) जो कोणी,—

(क) जल, प्रकाश, वीज किंवा ऊर्जा यांचे उत्पादन, वितरण किंवा पुरवठा यांच्याशी संबंधित एखादी इमारत, प्रतिष्ठापन किंवा इतर संपत्ती ;

(ख) तेल प्रतिष्ठापन ;

(ग) कोणतेही गटार, मल प्रणाल ;

(घ) कोणतीही खाण किंवा कारखाना ;

(ङ) कोणत्याही सार्वजनिक परिवहनाची किंवा दूरसंचारणाची साधने किंवा त्यांच्याशी संबंधित उपयोगात येणारी एखादी इमारत, प्रतिष्ठापन किंवा इतर संपत्ती.

अशा कोणत्याही सार्वजनिक संपत्तीच्या बाबतीत कोणतीही कृती करून आगळीक करील त्यास कमीत कमी सहा महिने, परंतु पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची व द्रव्यदंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयास न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील अशा कारणांसाठी सहा महिन्याहून कमी मुदतीच्या कारावासाची शिक्षा देता येईल.

सार्वजनिक संपत्तीस भाग किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे हानी पोहोचवणारी आगळीक.

४. जो कोणी, आग किंवा स्फोटक पदार्थ यांच्या वापराद्वारे कलम ३ च्या पोटकलम (१) किंवा (२) खालील अपराध करील, त्यास एका वर्षापेक्षा कमी नसेल, परंतु दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

परंतु, न्यायालय, न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील अशा विशेष कारणांसाठी एका वर्षाहून कमी मुदतीच्या कारावासाची शिक्षा देऊ शकेल.

जामिनासंबंधी विशेष उपबंध.

५. कलम ३ किंवा कलम ४ खालील शिक्षापात्र अपराधाचा आरोप असलेली किंवा सिद्धपराधी ठरवलेली कोणतीही व्यक्ती, जर अभिरक्षेत असेल तर, अभियोगास तिच्या सुटकेच्या अर्जास विरोध करण्याची संधी दिल्याखेरीज, तिची जामिनावर किंवा तिच्या स्वतःच्या बंधपत्रावर सुटका करण्यात येणार नाही.

व्यावृत्ती.

६. या अधिनियमाचे उपबंध हे, त्याकाळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या उपबंधांना न्यूनता आणणारे नसून त्या कायद्याच्या उपबंधाशिवाय आणखी भर म्हणून असतील आणि या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे एखाद्या व्यक्तीविरुद्ध या अधिनियमाहून वेगळ्याप्रकारे चालू करण्यात येणाऱ्या किंवा केलेल्या कार्यवाहीतून (मग ती अन्वेषणाच्या मार्गाने असो किंवा अन्यथा असो) त्या व्यक्तीस सूट मिळणार नाही.

निरसन व व्यावृत्ती.

७. (१) सार्वजनिक संपत्तीस हानी प्रतिबंध अध्यादेश, १९८४ (१९८४ चा ३) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झालेले असले तरीही, उक्त अध्यादेशाखाली केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा करण्यात आलेली कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई